दि. 28/02/2026

**प्रेसनोट**

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाच्या नांदेड व परभणी जिल्ह्यात धाडी

## नांदेड शहरातील भाग्यनगर भागात मटका तर परभणीत जुगार अड्ड्यावर छापा

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड शहरातील भाग्यनगर व परभणी जिल्ह्यातील ताडकळस भागात पोलीस पथक पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक 27.02.2026 रोजी नांदेड शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत छत्रपती चौक येथे आर.एम.आर. कॉम्लेक्समध्ये मटका बुक्कीवर कारवाई करत, 24,330/-रुपयांची रोकड, 30 हजार रुपयांचे (04) मोबाईल, 10 हजार रुपयांचा एक Lenovo कंपनीचा टॅब व 15,000 रुपयांचे इतर साहित्य असा एकूण 79,330/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (7) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द भाग्यनगर पोलीस ठाणे येथे गुरनं 106/2026 कलम 4, 5, 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास भाग्यनगर पोलीस ठाण्यातील सपोउपनि रावसाहेब जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे, आज दि. 28/02/2026 रोजी दुपारी 3.30 वाजण्याच्या सुमारास सदर पथकाने, परभणी जिल्हयातील ताडकळस पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या मौजे लिमला येथील राजकला क्रिडा व सांस्कृतिक मंडळ येथे छापा टाकून, सदर ठिकाणी जुगार खेळणाऱ्या (18) आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून 20,900/- रुपयांची रोकड व 2 मोबाईल फोन हस्तगत केले आहेत.

सदर क्रीडा व सांस्कृतिक मंडळ हे मूळ चिंचवडगांव, ता. वडवणी, जिल्हा बीड येथील पत्त्यावर नोंदणीकृत असून, त्याची प्रशिक्षण शाखा ही मौजे लिमला चालत असल्याचे व सदर ठिकाणी लोकांना पत्ते खेळण्याचे प्रशिक्षण देत असल्याचे, मॅनेजर कैलास शिंदे यांच्याकडून सांगण्यात आले. मात्र, यासंबंधीचे अभिलेख ते पोलिसांना दाखवू शकले नाहीत.

सदर जुगार अड्ड्यावर, देशी दारू आणि इतर तंबाखूजन्य पदार्थ देखील मिळून आल्याने, संबंधितांविरुद्ध कलम 4, 5 मुंबई जुगार कायदा, कलम 65 (इ) मुंबई दारूबंदी अधिनियम व कलम 6 (ब) व 24, सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य उत्पादने कायदा, 2023 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास ताडकळस पोलीस ठाण्याचे, पोलीस उपनिरीक्षक सतीश तावडे हे करत आहेत.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा 91 50 100 100 या ‘खबर’हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड